# चीनचे डोकलाम हे निमित्त ओबोर हेच लक्ष "?

**प्रा.डॉ. प्रदीप दंदे,** राज्यशास्त्र विभाग प्रमुख, महिला कला -वाणिज्य महाविदयालय,चांदुररेल्वे जि. अमरावती

सिक्किम लगत चीन, भूतान व भारताच्या सिमेवर असलेल्या डोकलामच्या मुद्ध्यावरून भारत आणि चीन यांच्यात मागील तिन महिन्यापासून वाद सुरु आहे.२८जूनला चीनने डोकलाम मधे रस्ते बान्धनिला सुरुवात केल्याने भारताने त्याला विरोध केला. डोकलाम हा भूतानचाच भाग असल्याचे भारत व् भुतान यांचे म्हणणे आहे. तर भारतीय लष्कराने आमच्या भूभागात घुसखोरी केली असल्याने त्यांनी तातडीने तेथून माघार घ्यावी,असा चीनचा हट्ट आहे. तर १९६१ पासून भुतानच्या नकाश्यावर असलेलाडोकलाम हा भूतानचा भूभाग असून त्याच्या संरक्षणाची जबाबदारी भारतावर आहे,त्यामुळे चीनने तेथून काढता पाय घ्यावा , असे भारताचे म्हणणे आहे . डोकलाम मध्ये चीन व भारताने सैनिक शक्ती उभी केल्याने डोकलाम सध्यस्थितीत युद्धभूमी ठरू पाहत आहे. चीनने सार्वभौमत्वाचा हवाला देत भारताने डोक्लामच्या मुद्ध्यापासून बाजूला होत चीनला सहकार्य करावे अशी भूमिका मांडली . डोकलाम वरून चीन व्भूतान य्यांच्यात २४ वेळा द्विपक्षीय बैठकी झाल्यात परंतु त्यांच्यात डोकलाम चा प्रश्न सुटला नाही त्यामुळे आन्तरर्राष्ट्रीय करारानुसार दोन देशात सिमाबाबत वाद असल्यास तो वाद संपे पर्यंत त्या प्रदेशात परस्पर देशांनी हस्तक्षेप करू नये असे ठरले आहे.तरीही चीनने डोकलाम मध्ये रस्ते बांधणीला सुरुवात केल्याने भारताने त्याला विरोध केला. कारण डोकलाम हा प्रदेश सिक्कीमच्या अत्यंत लगतचा भाग आहे. चीनने रस्ते बांधल्यास चिनी सैन्य थेट सिलिगुडी पर्यंत पोहोचणार आहे हे भविष्यात भारतासाठी धोक्याचे ठरू शकते त्यामुळे भारत हा डोकलामच्या मुद्द्यांवर भूतानला मदत करीत आहे.

चीनने डोकलाम च्या सभोवताल पीएलए च्या फ़ोजा उभ्या केल्या आहेत इतकेच नव्हे तर भारतात स्वातंत्र्याच्या 71 व स्वातंत्र्यदिन साजरा करीत असताना 15 ऑगस्ट ला लेह जवळ ही घुसखोरी केली त्याला भारतीय सैन्याने हुसकावून लावले एवढ्यावरच चीन थांबला नाही तर अरुणाचल प्रदेश च्या तवांग मधेही घुसखोरीचा प्रयत्न चालविला.चीन सोबत भारताचे अकसाई चीन, अरुणाचल प्रदेश मधील तवांग,जम्मूकश्मीर च्या लेहच्या लदाख आणि सिक्कीम मधील सीमारषेवरून वाद आहेत. आंतरराष्ट्रीय करारानुसार प्रत्येक देशाच्या सीमारेषा ओळखता याव्यात म्हणून मॅकमोहन सीमारेषा आखून दिलेल्या आहेत.शिवाय द्विपक्षीय कराराही झाले आहेत त्यानुसार वादग्रस्थ विभागात परस्पर देशांनी हस्तक्षेप वा कोणतेही काम करू नये ,असे ठरले असतानाही चीन मॅकमोहन सीमा रेषेला न जुमानता भारताच्या सीमेत घुसखोरी करीत आहे. यावेळी चीनने आधी भूतान च्या ताब्यात असलेल्या डोकलाम मध्ये घुसखोरी केली त्याला भारताने प्रतिकार करीत हुसकावण्याचा प्रयत्न केला यामुळे चिडलेल्या चीनने आपला मोर्चाला तवांग व लेह लदाख कडे घूसखोरी केली आहे .

डोकलाम ज्याला चीन डोंगलांग म्हणतो त्या भागात मागील तीन महिन्यापासून भारत चीन एकमेकासमोर युद्धाच्या भूमिकेत उभे असले तरी चीन स्व:ताहून युद्ध करण्याची शक्यता कमी आहे . भारताच्या थेट सिलीगुडी पर्यंत जाण्याचा एकमेव मार्ग म्हणून चीनला डोकलाम तर हवा आहेच परन्तु त्यापेक्षाही चीनला हवा ओबोर One Belt -One Road Initiative ओबोर हां चिनचा अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प आहे,त्यातील चायना-पाक इकोनोमिक कोरिडोर पाक व्याप्त कश्मीर - POK मधून पाकिस्तानच्या ग्वाटर बंदराकडे जाणार आहे, पाक व्याप्त कश्मीर हा भारताचा भूभाग असल्याने भारताने सार्वभौमत्वाच्या मुद्ध्यावरून ओबोरला विरोध केला आहे. चिनी वस्तुसाठी भारत देश मोठी बाजारपेठ आहे. चीन मधून भारतात मोठ्या प्रमाणात व्यापार होतो.त्यामुले भारत हा चिनचा मोठा लाभार्थी देश असल्याने चीन ला भारताचा ओबोर साठी पाठिंबा हवा आहे.ओबोरचा व्यापार लंडन,रशिया सह आशिया-युरोपातिल ६५ देशाहून अधिक देशात करण्याचा चीनचा मानस आहे त्यामुळे ओबोरचा आवाका या पुर्वीच्या व्यापारी प्रकल्पापेक्षा प्रचंड मोठा आहे.या प्रकल्पात चीन मधून थेट लंडन पर्यंत रेल्वेमार्ग तयार केला तर पुढे हायस्पीड ट्रेन साठी रेल्वेजाळे उभे करणार आहेत ,आता पुढचा टप्पा म्हणून चीन -पाकिस्तान पर्यंत उंच पर्वतरांगातून हायवेज ची निर्मिती करणार आहे. चीन मध्ये स्टील,सिमेंट यांचे अपेक्षेपेक्षा अधिक उत्पादन झाले आहे,शिवाय इंफ्रास्टकचर क्षेत्रात त्यांच्याकडे कुशल कारागिरांची मोठी फौज तयार असल्याने त्याना जगातील अन्य देशातील मोठ्या प्रकल्पांची अपेक्षा आहे.आणि अत्यंत महत्वाचे म्हणजे तेथील जिडीपी हा मागील दोन वर्षापासून कमी झाला आहे.अश्यास्थितीत ओबोरचा उभा केलेला मोठा आवाका बघता चीन हा भारताबरोबर युद्ध करेल हि शक्यता कमीच आहे. भारताचे चीन सोबत केवळ डोकलाम वरुनच वाद आहे असे नाही तर अरुणाचल प्रदेश,सिक्कीम,लेह-लद्दाख आणि सियाचीन ग्लेशियर या भागावरुनही वाद आहेत. तिबेटचे निर्वासित बौद्ध धर्म गुरु

दलाई लामा यांनी नुकतीच तवांगला भेट दिली असता चीनने त्याभेटीचा विरोध केला होता.तवांगच्या बदल्यात चीन सियाचीन ग्लेशियर भारताला देऊ इच्छितो यावरून चीनचा तवान्गमधील दलाई लामांच्या भेटीचा विरोध लक्षात घेण्याजोगा आहे.

दुसर्या महायुद्धानंतर जगातील सर्व राष्ट्रे स्वतंत्र आहेत त्यांनी आपल्या सीमारेषेत राहून राज्यकारभार पाहावा हे आन्तरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्राने धोरणात्मक रीत्या सांगूनही चीन विकासाच्या नावावर अथोरिटेरिअन स्टेट च्या भूमिकेत राज्यकारभार करताना दिसून येतो.ओबोरच्या निमित्ताने चीन श्रीलन्केतील हम्मामतोता व् पाकिस्तान मधील ग्वाटर बंदर विकसित करीत आहे.त्यामुळे चीनचे सैन्य तळ तेथे उभे राहू शकते तसेच चीन पाकिस्तान पर्यंत रस्ते मार्ग हायवेज उभारू इच्छित असल्याने सामुद्रिमार्गासह रस्ते रेल्वे मार्गाने भविष्यात भारताला घेरण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळेही भारत ओबोर मधे सहभागी होऊ इच्छित नाही. डोकलाम च्या मुद्द्यावरून सुरु झालेला वाद हा सार्वभौम सत्तेचा परीघ विस्तारू पाहतोय. परस्पर सहमतीने ओबोरमुळे तर तो थेट लंडन पर्यंत पोहोचला आहे.आज घडीला तो व्यापारासाठी वापरण्यात येणार असला तरी भविष्यात युद्धासाठी वापरल्या जाणार नाही याची शास्वती देता येत नाही ही बाब लोकशाही राज्यासाठी धोक्याची घंटा ठरणार आहे.त्यामुळेही ओबोर भविष्यातील इस्ट इंडिया कंपनी तर असणार नाही ना अशी शंका येते .डोकलाम वरून अमेरिका,जपान भारताच्या बाजूने आहेत तर नेपाळने मात्र डोकलाम वर तटस्थतेची भूमिका घेतली आहे.

सध्यस्थितीत डोकलाम वरून सुरु असलेल्या वादात भारत-चीन दरम्यान युद्धाची स्थिती भारताच्या मुत्सद्दीगिरीने सदध्यस्थीतीत संपली आहे. ओबोर ला भारताचा पाठींबा हवा असल्याने चीन भारतासोबत युद्ध पुकारू इच्छित नाही हेच दिसून येते,तशी अंतर्गत स्थिती चीन मध्ये नाही तसे झाल्यास चीन चे उद्योजक दुसऱ्या देशात विस्थापित होण्याची भीती चीनला आहे. असे असले तरी विकासाच्या नावावर “Democracy within Authoritarian Democracy” सार्वभौमसतेचा परिघ विस्तारु पाहतेय ही बाब सांसदीय लोकशाही गिळंकृत करू इच्छिते हे नक्की.